

# परीक्षा हे जीवनाचे अंतिम ध्येय नव्हे : सारंग बालंखे

**सैनिक टाकळी : प्रतिनिधी–**

जीवनामध्ये यशस्वी होताना अनेक टप्पे पूर्ण करावे लागतात . त्यामधीलच एस.एस.सी. परीक्षा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. कोणत्याही परीक्षेला धैर्याने सामोरे गेले पाहिजे,असे मत रोटरी क्लब पुणे विझडमचे प्रेसिडेंट सारंग बालंखे यांनी व्यक्त केले.

येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलमधील एस.एस.सी. विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ झाला.

दिनेश सुभेदार म्हणाले, जीवनामध्ये यशस्वी झाल्यानंतर आपण समाजासाठी काही कार्य केले पाहिजे.ही जाणीव आपण सातत्याने ठेवली पाहिजे. मुख्याध्यापक विनोद पाटील यांनी, जीवनात आई-वडील व गुरु यांचा अवमान होईल असे कोणतेही कृत्य करू नये असे सांगितले.एम एम धुमाळे, एस.व्ही.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सचिव राजेश पाटील, उपाध्यक्ष एस. वाय. पाटील,पी.जी .पाटील यांच्या हस्ते विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळालेल्या खेळाडू व गतवर्षी एस.एस.सी परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. स्वागत उदय पाटील यांनी केले. आभार आर.एस.खोपडे यांनी मानले.